नवप्रभा
बुधवार दि. ११ जून २०१४



# श्नायडर इलेक्ट्रिक इंडियातर्फे जागतिक पर्यावरण सप्ताह

**पणजी**

श्नायडर इलेक्ट्रिक इंडिया, वेर्णा यांच्यातर्फे अलीकडेच विविध उपक्रमांसह जागतिक पर्यावरण सप्ताह पाळण्यात आला.

या सप्ताहा दरम्यान, श्नायडर इलेक्ट्रिक इंडिया यांनी गोवा वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने रस्ता सुरक्षेविषयी जागृती घडवून आणली. वाहतूक पोलिसांसमवेत कर्मचाऱ्यांनी दुचाकी, चार चाकी वाहन चालकांमध्ये जागृती कार्यक्रम राबविला.

वृक्षारोपण, वेर्णा नागोवा येथे प्लास्टिक गोळा करण्याची मोहीम राबविण्यात आली. यावेळी नागोवाचे सरपंच फ्रँकी वालीस उपस्थित होते. वालीस यांनी या उपक्रमाचे स्वागत केले. पाण्याचे महत्व या विषयावर कार्मचाऱ्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यात लीला टेक्नॉलॉजीसचे संचालक प्रदीप सरमोकादम यांनी मार्गदर्शन केले. सापांविषयी माहितीपर कार्यक्रम अमृतसिंग यांच्यातर्फे आयोजिण्यात आला.

या संपूर्ण उपक्रमासाठी सर्वानन जनार्दनन व सर्वेश परब यांनी समन्वयकाची जबाबदारी पार पाडली.